ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाविलास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख २३ मे, १९५१ अंक २१

## विविध माहिती

**निजाम महाबळेश्वरला बंगला घेणार**—हैद्राबादच्या निजामांची प्रकृति नुकतीच बिघडली होती. तब्येतीला आराम वाटावा म्हणून दरवर्षी उन्हाळयांत महाबळेश्वरीं रहाण्याचा सल्ला त्यांना देण्यांत आला आहे. म्हणून महाबळेश्वरांत एखादा विस्तीर्ण बंगला खरेदी करण्याचा विचार निजाम करीत आहेत. उटकमंड येथें निजामांचें एक निवासस्थान आहे. परंतु ४,००० फुटांपेक्षां अधिक उंच असलेलें महाबळेश्वर प्रकृतिस्वास्थ्यासाठी अति उंच उटकमंडपेक्षा अधिक उपयुक्त ठरण्यासारखे आहे.

**उत्तर प्रदेशासाठी इंड. फिनान्स कॉर्पोरेशन**—उत्तर-प्रदेशाच्या नियंत्रक बोर्डानें उद्योगधंद्यांना मदत देण्यासाठी एक इंडास्ट्रिअल फिनान्स कॉर्पोरेशन स्थापन करण्याची सूचना केली आहे. योग्य त्या उद्योगधंद्यांना भांडवल पुरविण्याचा उद्देश हा प्रमुख मानण्यांत यावा; नव्या धंद्यांना किमान नफा मिळवून देण्याची हमी अगर नुकसान आल्यास त्यापैकीं कांहीं टक्के स्वतः सोसण्याची हमी कॉर्पोरेशननें द्यावी, अशाहि शिफारसी करण्यांत आल्या आहेत.

**पेट्रोलच्या तुटवड्यामुळें लग्नसमारंभाचा विरस**—गुजराथमध्यें सध्यां लग्नाचा हंगाम जोरात सुरू आहे. नेमक्या ह्याच वेळीं पेट्रोलच्या पुरवठ्यांत ३३ टक्के कपात करण्यांत आल्यामुळें लग्नाच्या मिरवणुकींचा विरस झाला आहे. मोटारी ऐवजीं बैलगाड्या आणि घोडे ह्यांचा वापर नवरदेवांसाठीं करावा लागत आहे.

**पाकिस्तानांत रबराच्या बुटांचा कारखाना**— मोटारींच्या टायर्सचा व ट्युबांचा उपयोग करून रबराचे बूट बनविणारे दोन कारखाने लवकरच कराचीला निघणार आहेत. ह्या कारखान्यांसाठीं लागणारी यंत्रसामुग्री स्पेनहून मागविण्यांत आली आहे. प्रत्येक कारखान्याला ५०,००० रुपये भांडवल लागेल आणि त्यांतून दररोज २,००० बुटांच्या जोड्या तयार होतील.

**वनमहोत्सवांतील वृक्ष**— भारतीय सरकारच्या अन्नमंत्र्यांनीं पुरस्कृत केलेल्या वनमहोत्सवांत सुमारें ३ कोटी वृक्षांचें आरोपण करण्यांत आलें होतें. त्यापैकीं २० टक्के झाडें (६० लाख वृक्ष) जगून राहिलीं आहेत असें समजतें. मुंबई राज्यांत मात्र २१ टक्के वृक्ष जिवंत राहिले आहेत.

**जिल्हा बोर्डाचा सायकलींवर कर**—अमृतसर जिल्हा बोर्डानें आपल्या हद्दींतील सायकलींवर दरवर्षी सायकलमागें २ रुपये कर बसविण्याचें ठरविलें आहे. कराबद्दल कांहीं हरकती असल्यास त्या नोंदविण्यास लोकांना आवाहन करण्यांत आलें आहे.

**खताच्या वाटणीसाठीं कर्जाची मागणी**—मद्रास सरकारनें खत वापरण्यासाठीं शेतकऱ्यांना दर एकरीं २५ रुपये बिनव्याजी कर्ज देण्याचें ठरविलें आहे. जास्तींत जास्त २०० रुपये कर्ज देण्यांत येईल. ही योजना पार पाडण्यासाठीं मध्यवर्ती सरकारकडे १ कोटी रुपयांच्या कर्जाची मागणी करण्यांत येणार आहे. ज्या जमिनींना पाण्याचा निश्चित पुरवठा होऊं शकेल त्यांनाच हीं कर्जें मिळणार आहेत. गेल्या वर्षी मद्रास सरकारनें ७३ लाख रुपये खत-कर्ज म्हणून वाटले होते. योग्य वेळीं पुरेसें खत वापरल्यास प्रांतांतील अन्नधान्याचें उत्पादन २० टक्के वाढेल असा अंदाज आहे.

**टेलिफोन्सबाबत स्वयंपूर्णता**—बंगलोरच्या इंडिअन टेलिफोन इंडस्ट्रीज ह्या कंपनीच्या मॅनेजिंग डायरेक्टरांनीं असा विश्वास व्यक्त केला आहे कीं येत्या दोन वर्षांत टेलिफोन्स व त्याचे भाग ह्या बाबतींत भारत पूर्णपणें स्वयंपूर्ण होईल. तसें झाल्यास भारताचे दरवर्षी २॥ कोटी रुपये परदेशीं जाण्याचे वांचतील. बंगलोरला तयार होणारे टेलिफोन्स धुळीला व किड्यांना दाद न देणारे असे आहेत.

**भारत-पाकिस्तान व्यापार**—१९५०-५१ साली भारत व पाकिस्तान ह्यांच्या दरम्यान ७४,५१,१३,००० रुपये किंमतीचा व्यापार झाला. निर्यात ३,०५७ लाख रुपयांची आणि आयात ४,३९३ लाख रुपयाची झाली. ह्याच कालावधींत अफगाणिस्थानशीं ९६१ लाख रुपयांचा व इराणशीं ४,२९३ लाख रुपयांचा व्यापार झाला.

**परिचारिकांची पदवी-परीक्षा**—दिल्ली विद्यापीठानें परिचारिकांच्या पदवीपरीक्षेचा अभ्यासक्रम चालू वर्षापासून ठेवण्याचें ठरविलें आहे. कॉलेज ऑफ नर्सिंग ह्या संस्थेत ह्या विषयाच्या बी. एससी. च्या पदवीचें शिक्षण देण्यांत येईल. अभ्यासक्रम चार वर्षांचा आहे. भारतांत ह्या विषयाला विद्यापीठाच्या पदवीचा दर्जा देणारें हें पहिलेंच विद्यापीठ आहे.

**युरोपमधील एंजिनियरिंगचे कारखाने**—युरोपमधील एंजिनिअरिंगच्या कारखान्यांसंबंधीं एक अहवाल इकॉनॉमिक कमिशन फॉर युरोपतर्फे प्रसिद्ध झाला आहे. अत्यंत जरूर असलेल्या कच्च्या मालाच्या तुटवड्यामुळें ह्या कारखान्यांच्या भवितव्याविषयीं कमिशननें चिंता व्यक्त केली आहे. सो. रशिआनें आपलें औद्योगिक उत्पादन ४० टक्के वाढविल्याचेंहि नमूद करण्यांत आलें आहे. जगांत अमेरिका सोडून रशिआमध्यें सर्वांत अधिक यांत्रिक हत्यारें असल्याचें अहवालांत सांगितलें आहे.

## शेतकी सहकारी परिषद

पुणें जिल्हा शेतकी सहकारी परिषद पुणें येथें ११ व १२ मे. १९५१ या दिवशीं मुंबई राज्याच्या गृहखात्याचे उपमंत्री श्री. यशवंतरावजी चव्हाण यांचे अध्यक्षतेखालीं पार पडली. या परिषदेचें उद्घाटन अर्थमंत्री श्री. वैकुंठराय मेहता यांनीं केलें. या परिषदेचें वैशिष्ट्य असें कीं जिल्ह्यांतील केवळ शेतकी व विविध सहकारी सोसायट्यांचे प्रतिनिधी यांचीच ही परिषद होती.

ना. वैकुंठराय मेहता यांचें भाषण नेहमीप्रमाणेंच अभ्यासपूर्ण व माहितीपूर्ण असें झालें. त्यांनीं आपल्या भाषणांत सन १९४८–४९ सालीं १,६३,८७५ सहकारी सोसायट्या असल्याचें सांगून त्यापैकीं १,३५,०८३ शेतीविषयक असल्याचा उल्लेख केला. पुणें जिल्ह्यांतील सहकारी संस्थांबद्दल बोलतांना शेंकडा ६७ गांवांत सहकारी सोसायट्या असून एकूण १९ लाख लोकसंख्येपैकीं ४॥ लाख लोकांनीं म्हणजे शेंकडा सुमारें २५ टक्के लोकांनीं सहकारी चळवळींत प्रवेश केला आहे असें त्यांनीं सांगितलें. अर्थमंत्र्यांनीं आपल्या भाषणांत, सहकारी चळवळीनें अधिक धान्य पिकविण्याचे मोहिमेंत आवश्यक तेवढा मोठा भाग न घेतल्याबद्दल असमाधान व्यक्त केलें. सामुदाइक पद्धतीनें शेती करणाऱ्या संस्था अधिक प्रमाणांत निघण्याची त्यांनीं आवश्यकता प्रतिपादन केली. शेवटीं, चळवळींत स्त्रियांचें सहकार्य मिळविण्याचे प्रयत्न केले जावेत व चळवळींचें महत्त्व बहुजन समाजास पटवून सांगावें म्हणजे अधिक कार्यकर्ते निर्माण होतील असें त्यांनीं सांगितलें. परिषदेच्या अध्यक्षांनीं आर्थिक समता स्थापन करण्यासाठीं सहकारी चळवळीचा चांगला उपयोग होईल व आर्थिक जीवनांतील महत्त्वाचे प्रश्न सोडविण्यास या चळवळीसारखें दुसरें प्रभावी साधन नसल्याचें सांगितलें.

या परिषदेनें बरेच ठराव केले असून मुख्यतः सध्यां मिळणारें कर्जाचें प्रमाण वाढवून मिळावें, जिंदगीची किंमत वाढवून मिळावी, शेती उत्पादनासाठीं खतें–बीं–बियाणें–अवजारें सुलभ रीतीनें मिळावींत, सभासदांना कर्ज कमी व्याजांत मिळावें म्हणून स्थानिक ठेवी जास्त प्रमाणांत मिळविण्यांत याव्या, वगैरे ठराव केले असून आणखी एक महत्त्वाचा ठराव असा केला आहे कीं शेतकऱ्यांनीं लेव्ही दिल्यावर उरणारें जादा धान्य त्यांस मोकळ्या बाजारांत विकण्याची परवानगी असावी. यामुळें शेतकरी अधिक धान्य पिकविण्यास प्रवृत्त होईल असें ध्वनित केलें गेलें. या ठरावावर अधिकारी वाणीनें प्रा. द. गो. कर्वे यांनीं भाषण केलें. परिषदेनें एक समिति नेमून तिचेकडे ठरावांची अंमलबजावणी करण्याचें काम दिलें आहे.

अधिवेशन यशस्वी झालें, परंतु या अधिवेशनामध्यें शेतीविषयक गरजांचा जसा विचार झाला तसा शेती सुधारणा व त्या द्वारें शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिति सुधारण्याच्या प्रश्नांचा विचार झाला नाहीं. आमचे मतें, यापुढें शेती सहकारी चळवळींची यशस्वितता प्रामुख्यानें शेती सुधारणा योजना आखून त्या अंमलांत आणणेचे प्रयत्नांवर अवलंबून आहे. तसेंच अद्याप नागरी व ग्रामीण सहकारी कार्यकर्ते यांचे विचारामध्यें आपुलकी निर्माण होऊं शकत नाहीं. सहकारी चळवळीच्या दृष्टीनें नागरी सहकारी कार्यकर्त्यांनीं ग्रामीण भागांतील सहकारी चळवळ व त्यांचे प्रश्न याकडे अधिक आपुलकीनें पाहून त्यांचा विश्वास निर्माण करणें अगत्याचें आहे.

दी
बँक ऑफ कोल्हापूर, लि.
एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.
[ *कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली.* ]
स्थापनाः १९२६.
मुख्य कचेरी :
सर वडवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.
तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | १,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :
(१) गुजरी (२) शाहूपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई–फोर्ट–(१०) मुंबई–मांडवी.
—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—
मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.
व्ही. प. सावंत, जनरल मॅनेजर.

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड
स्थापना–१९१७
फोन नं. १४८३ | तारेचा पत्ता " Cencobank " | पोस्टबॉक्स नं. ५११
मुख्य कचेरी–लक्ष्मी रोड, पुणें शहर.
शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.
—: शाखा :—
जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा, मंचर, भोर पौड व वडगांव (मावळ)
—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—
जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.
मो. वि. रबडे
मॅनेजिंग डायरेक्टर

—सर्व प्रांतांतील— सुती–गरम–रेशमी —खादीचें माहेरघर— ||| खादी मन्दिर ||| २६१, बुधवार पेठ ढमढेरे बोळाजवळ, पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. २३ मे, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सर्वच गोष्टी चलनवाढीस अनुकूल !

कोरियन युद्धास प्रारंभ झाल्यापासून जिनसांचा तुटवडा पडूं लागला, किंमती कमालीच्या चढूं लागल्या आणि त्यामुळें चलन-विस्तारास सर्वत्र चालना मिळाली. भारतामध्येंहि इतर देशांप्रमाणेंच अनुभव आला. रिझर्व्ह बँकेनें काढलेल्या व व्यवहारांत खेळत असलेल्या चलनी नोटांत कशी जलद वाढ होत चालली आहे, ह्याचे तुलनात्मक आकडे 'अर्था''च्या १६ मे च्या अंकांत दिलेलेच आहेत. ४ मे रोजीं रिझर्व्ह बँकेनें काढलेल्या नोटांची किंमत १३०२ कोटी रु. होती, ती ११ मे रोजीं १३१२ कोटींपर्यंत पोंचली. १९५० मधील मे महिन्यांतील आकड्यांची सरासरी घेतली, तर ती ११४७ कोटी रु. होती. म्हणजे, १२ महिन्या-पूर्वीच्या मानानें आतां चलनांत १५५ कोटी रुपयांची वाढ झालेली आहे.

जिनसांची महर्गता हें चलनवाढीचें प्रमुख कारण तर खरेंच, परंतु त्या बरोबरच दुसरेंहि त्याचें एक महत्त्वाचें कारण आहे. भारताची निर्गत वाढवून आणि आयात कमी करून, परराष्ट्रीय व्यापारांत अनुकूल तफावत निर्माण करण्याचें सरकारचें धोरण आहे. त्याचा सहाजिकच परिणाम असा होतो, कीं भारताच्या परराष्ट्रीय देण्यापेक्षां येणें जास्त निघतें आणि तें इंग्लंडमध्यें पौंडी शिलकांच्या स्वरूपांत शिल्लक राहतें. इकडे, हिंदी मालाच्या खरेदीसाठी रोख रक्कम द्यावी लागते तिचेमुळें चलन ज्यास्त लागतें. रिझर्व्ह बँकेच्या ह्या चलनी नोटांसाठी लागणारें तारण पौंडी रोख्यांच्या स्वरूपांत वाढत जातें. विदेशी रोख्यांची रक्कम आतां ६९९ कोटी रुपयांचेपेक्षाहि ज्यास्त झाली आहे. मे, १९५० मध्यें ती ६४७ कोटी रुपये होती. मालाच्या निर्गतीमुळें आणि आयातीवरील बंधनांमुळें उपलब्ध माल कमी झाला आहे आणि चलनाचा पुरवठा मात्र वाढला आहे. सरकारी रोख्यांची बाजारांतील किंमत टिकवून धरण्याचा रिझर्व्ह बँकेचा प्रयत्न असतो. म्हणजे, रिझर्व्ह बँक ही रोखे स्वतःच खरेदी करते. रिझर्व्ह बँकेच्या इश्यू खात्यांत जिंदगीचे बाजूस मे १९५० मध्यें ४६३ कोटी रुपयांच्या हिंदी नोटा होत्या; आतां त्यांची किंमत ५१७ कोटींचे जवळ आली आहे.

बँकांकडून कर्जे मिळणें आतां फार कठीण झालें आहे, अशी गरजू लोकांची तक्रार आहे, तर बँकांनीं दिलेल्या कर्जांत भयंकर वाढ झाली असल्याचें आकडे सांगतात. ठेवींत वाढ झाली असली तरी कर्जे त्या मानानें अधिक वाढून कर्जांचें ठेवींशीं प्रमाण पुष्कळच वाढलें आहे. गेल्या बारा महिन्यांत ठेवी ४४ कोटी रुपयांनीं वाढल्या तरी कर्जे १०० कोटी रुपयांनीं वाढून कर्जांचें ठेवींशीं प्रमाण ५५% वरून ६४% वर गेलें. बँकांनीं दिलेल्या कर्जांतील वाढ अद्याप चालूच आहे. अशा रीतीनें चलनवाढ आणि बँकांची कर्जे ह्या दोन्ही मार्गांनीं मालाचा पुरवठा व चलन ह्यांमधील समीकरण अधिकाधिक बिघडवलें जात आहे ही परिस्थिति आटो-क्यांत आणण्यासाठीं कोणते उपाय योजावयाचे हें सांगतां येणें अवघड नाहीं; परंतु त्याचे परिणाम इतर आर्थिक परिस्थितीवर आणि प्रश्नांवरहि होतात. त्यामुळें उपाययोजना करणेंहि कठीण होतें. रहाणीच्या खर्चाचे मानांत वाढ होऊन सामान्य नागरिकांचें जीवन मात्र असह्य होऊं लागलें आहे.

शेड्यूल्ड बँकांची परिस्थिति ( आंकडे हजार रुपयांचे )

| | ११-५-१९५१ | १२-५-१९५० |
|---|---|---|
| १ चालू ठेवी | ६०९,५८,४३ | ५८७,८९,५३ |
| २ मुदती ठेवी | २९४,२७,२७ | २७१,६७,०८ |
| ३ एकूण देणें | ९०३,८५,७० | ८५९,५६,६१ |
| ४ रोकड | ३६,०६,६६ | ३४,६२,९३ |
| ५ रिझर्व्ह बँकेंतील शिल्लक | ४९,६०,३६ | ४९,४४,९४ |
| ६ कर्जें | ५७४,६०,४७ | ४६३,०४,७३ |
| ७ डिस्कौंट केलेलीं बिलें | ११,००,९५ | ११,९२,३३ |
| कर्जांचें देण्याशीं प्रमाण | ६४% | ५५% |

## श्री. देशमुखांचा इनूकमटॅक्स अधिकाऱ्यांना सल्ला

इनकमटॅक्स कमिशनर्सची एक बैठक दिल्ली येथें नुकतीच भरली होती, तिचे अध्यक्षस्थानीं अर्थखात्याचे उपमंत्री श्री. महावीर त्यागी हे होते. श्री. देशमुख, अर्थमंत्री, ह्यांनीं आपल्या भाषणांत इनूकमटॅक्स खात्याचें, त्यानें उठवलेल्या कामाच्या ढिगाबद्दल प्रथम अभिनंदन केलें. प्राप्तीकर बसविण्याच्या संबंधांतील अनेक इष्ट सुधारणांचा त्यांनीं उल्लेख केला. खात्याचें लोकांशीं वर्तन त्यांना सतावून सोडणारें व त्यांना कमी लेखणारें असतें, ह्या तक्रारीचा निर्देश करून श्री. देशमुख ह्यांनीं ह्या बाबत खात्याचें धोरण कर भरणारास न्याय्य असेंच असणें अगत्याचें आहे, हें स्पष्ट केलें. इनकमटॅक्स खात्याची प्राप्तीकर आकारणी अगदीं गैरहिशोबी व अडाणी पद्धतीची आहे; मनुष्यमात्र लबाड असतो ह्या भूमिकेवरूनच आकारणीची इमारत उभारलेली आहे; ज्यास्तींत ज्यास्त कर लादण्याचें अधिकाऱ्यांचें धोरण असतें; कराचा दर कितीहि असला तरी तो न्याय्य प्राप्तीवरच घेतला न जातां भरमसाट प्राप्ति गृहीत धरली जाते; त्याचा परिणाम पुनः व्हावयाचा तोच होतो; इत्यादि मुद्दे एका होरपळलेल्या नागरिकानें "अर्था''च्या दि. २९ मार्च, १९५१ च्या अंकांतील एका लेखांत मांडले होते.

इनकमटॅक्स अधिकाऱ्यांचें वर्तन समजूतदारपणाचें व सहानुभूतीचें असावें आणि कोणत्याहि नागरिकाची आपणावर अन्याय झाला अशी तक्रार राहूं नये, मग त्यावरील कराची आकारणी कमी झाली तरी चालेल, असा उपदेश श्री. देशमुखांनीं इनकमटॅक्स अधिकाऱ्यांना केला आहे. शक्य तितक्या कमी वेळांत ज्यास्तींत ज्यास्त काम संपवून अधिकांत अधिक रक्कम सरकारला जमवून देण्याची ज्यांचेवर जबाबदारी आहे, असें इनकमटॅक्स खातें अगोदरच अपुऱ्या नोकरांच्यामुळें त्रस्त झालें आहे. तेव्हां त्याचे अधिकारी श्री. देशमुखांचा सल्ला मानतील आणि व्यापारी वर्गाचे हाल कमी करतील, अशी आशा करावी काय ?

## टॉरके परिषदेची फलश्रुति

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेच्या पुरस्कारानें आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटनेची कल्पना निघाली. या संघटनेचा उद्देश जगांतील निरनिराळ्या देशांतील आंतरराष्ट्रीय व्यापार वाढावा व त्यापाराचे बाबतींत देशादेशांनीं एकमेकांवर जाचक होतील असे व्यापारी निर्बंध किंवा संरक्षक जकाती ठेवूं नये हा होता. जगांतील देशांत खुला व्यापार सुरू व्हावा व भांडवल गुंतवणुकीवर व भांडवलाच्या हालचालींवर निर्बंध असूं नयेत, हाहि उद्देश होता. सारांश, व्यापारी दृष्ट्या समान पातळीवर एक जग निर्माण व्हावें हा या संघटनेचा उद्देश होता.

या संघटनेचें सुरुवातीचें कार्य म्हणून जीनेव्हा येथें प्रमुख राष्ट्रांची बैठक होऊन व्यापार व जकाती यांबाबतींत सर्वसामान्य करार करण्यांत आला. या उद्देशानें हॅवाना, जीनेव्हा, व ॲनेसी येथें आतांपर्यंत तीन परिषदा झाल्या व या तीन परिषदांच्या कार्यांतूनच टॉरके येथें परिषद भरविण्यांत येऊन तिची बैठक सुमारें सात महिने चालून ती २१ एप्रिल, १९५१ रोजीं समाप्त झाली. या वाटाघाटींतून विशेषसें निष्पन्न झालें नाहीं व दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटनेच्या कल्पनेला टॉरके परिषदेंत प्रत्यक्ष अमेरिकेकडूनच नकार मिळून अशी संघटना स्थापन करण्याच्या कल्पनेला आज तरी कायमची मूठमाति देण्यांत आली. खुद्द अमेरिकेनें पुरस्कृत केलेली ही कल्पना असून तिला अमेरिकेकडूनच अमान्यता देण्यांत आली ही गोष्ट दिसावयास असंबद्ध दिसली तरी ती जगाच्या आर्थिक व्यवहाराच्या दृष्टीनें योग्यच झाली असें म्हटलें पाहिजे. कारण पांच वर्षांपूर्वी जेव्हां ही कल्पना पुरस्कारिली गेली त्यावेळची परिस्थिति व हल्लींची परिस्थिति यांत फार मोठे बदल घडून आले आहेत. राजकीय व आर्थिक दृष्ट्या जगांतील निरनिराळे देश एकमेकांजवळ आले आहेत असें जितकें १९४६ सालीं वाटत होतें, तितकेच ते आतां एकमेकांपासून दुरावले आहेत असा हल्लीं. विशेषतः गेल्या वर्षापासून, अनुभव येत आहे. अमेरिका व इंग्लंड हीं राष्ट्रें एका बाजूला, रशिया व त्याच्या वर्चस्वाखालील राष्ट्रें एका बाजूला, आशिया मधील स्वतंत्र झालेलीं परंतु मागसलेलीं राष्ट्रें एका बाजूला, जपान व जर्मनी या युद्धांत पराभव पावलेल्या परंतु ज्यांचें औद्योगिक जीवन पूर्वीप्रमाणें पुन्हां सुरू झालें पाहिजे अशा देशांचे प्रश्न, मुसलमानी राष्ट्रें व नुकताच उपस्थित झालेला इराण मधील तेलाच्या राष्ट्रीयीकरणाचा प्रश्न इ. प्रकारचे स्पष्ट भेद आज जगांत दिसत आहेत. याच्याच जोडीला आर्थिक दृष्ट्या कष्टसाध्य चलनाच्या डॉलर गटांतील देश व स्टर्लिंग गटांतील सुलभ चलनाचे देश असे गट निर्माण झाले आहेत. ॲटलांटिक कराराप्रमाणें पॅसिफिक करार करण्याची आवश्यकता भासत आहे. दक्षिण आफ्रिकेसारखें राष्ट्र कांहीं बाबतींत स्वतःचें धोरण यनोला न जुमानतां चालवीत आहे. कोरियन युद्धापासून राजकीय व व्यापारी क्षेत्रांत आणखी मतभेद निर्माण झाले आहेत. या सर्व गोष्टी गेल्या पांच वर्षांत जगांतील राष्ट्रांमधले राजकीय व आर्थिक भेद कसे वाढत चालले आहेत हें स्पष्टपणें दाखवितात. अशा वातावरणांत खुद्द अमेरिकेनें आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटनेच्या कल्पनेला मूठमाति यावी ही गोष्ट आजच्या बदललेल्या परिस्थितीचीच निदर्शक आहे.

आतां टॉरके परिषदेंत कांहीं गोष्टी साध्य झाल्या त्यांचा उल्लेख पटें केला आहे. पश्चिम जर्मनी, ऑस्ट्रिया, टर्की, फिलिपाइन्स, पेरू व युराग्वे या देशांनीं परिषदेंत प्रथमच भाग घेतला. निरनिराळे १४७ व्यापारी करार या परिषदेंत संमत करण्यांत आले. पूर्वीच्या परिषदांतून मान्य करण्यांत आलेल्या जकातींच्या सवलतींची मार्च, १९५४ अखेरपर्यंत मुदतवाढ करण्यांत आली. या परिषदेंत एकंदर ३८ देशांनीं भाग घेतला होता. जास्तींत जास्त व्यापारी सवलती परस्परांपासून मिळविण्याचा प्रयत्न करण्यांत आला. याप्रमाणें १९५४ पर्यंत १४७ व्यापारी करार करण्यांत आले आहेत. त्यांच्या अनुरोधानें जागतिक व्यापाराला स्थैर्य प्राप्त झालें आहे. जगांत चालणारा ८० टक्के आयात व्यापार व ८५ टक्के निर्यात व्यापार टॉरके परिषदेंतील करारांच्या कक्षेंत आला आहे. परंतु एवढें जरी साध्य झालें असलें तरी ही सर्व योजना १९५४ च्या मार्चअखेरपर्यंतचीच आहे. परिषदेंत भाग घेणाऱ्या देशांना वाटाघाटींत असें दिसून आलें कीं, आपण दुसऱ्या देशांना ज्या सवलती देऊं त्यांनीं उच्चांक गांठला असून आणखी सवलती देणें अशक्य आहे. आणखी स्पष्टपणें दिसून आलेली गोष्ट ही कीं व्यापारी जकाती कमी करणें आज अगदीं अवघड व अशक्य झालें आहे. व्यापारी जकातीमुळें आज कित्येक देशांच्या शेती व उद्योगधंदे यांना संरक्षण मिळत आहे व हा संरक्षणाचा फायदा मिळत राहावा अशी या देशांची परिस्थिति आहे. याचाच अर्थ हा कीं, सर्व जगांत खुला व्यापार हें ध्येय जरी स्तुत्य असलें तरी निरनिराळे देश आर्थिकदृष्ट्या इतके डबघाईस आले आहेत कीं, संरक्षक जकातींचा फायदा घेऊन आपले उद्योगधंदे सुधारावे असें त्यांस वाटत आहे. हिंदी व्यापारी वर्गाहि सामान्यपणें हॅवाना चार्टरच्या विरुद्धच आहे. तरी टॉरके परिषदेंतील अनुभवावरून व्यापारी धोरणाच्या बाबतींत हिंद सरकारला शिकण्यासारखें पुष्कळ आहे.

---

**उत्तर प्रदेशांतील पांच योजना पुऱ्या झाल्या**—उत्तर-प्रदेश सरकारनें हातीं घेतलेलीं पांच मोठीं धरणें नुकतींच पुरीं झालीं आहेत. ह्या सर्व धरणांना मिळून १ कोटी, ५ लाख रुपये खर्च आला. धरणांचें पाणी जमिनींना येत्या जूनपासून मिळूं लागेल. सर्व धरणांच्या पाण्यानें १॥ लाख एकर जमिनीला हुकमी पुरवठा होऊं शकेल, आणि अन्नधान्याचें उत्पादन दरवर्षी ६६,००० टनांनीं वाढेल असा अंदाज करण्यांत आला आहे.

बँक ऑफ महाराष्ट्र लि.
लक्ष्मी रोड पुणें २
बँकेच्या शाखा
मुंबई, नाशिक, चाळिसगांव, धुळें, जळगांव, नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर कोल्हापूर, व द. हैद्राबाद.
ग. ल. हळवे,
ॲ. मॅनेजर.

## सेन-रॅले कंपनीचा सायकलीचा कारखाना

पाय मारून चालविण्याच्या सायकली भारतांत सुमारें १५ लाख असाव्या असा अंदाज करण्यांत आलेला आहे. दर हजार लोकसंख्येमागें ३·८५ सायकली असें प्रमाण पडलें. इतर देशांच्या मानानें भारतामधील सायकलींची संख्या फार कमी आहे, हें पुढील आकड्यांवरून दिसून येईल.

| देश | वापरांत असलेल्या सायकलींची संख्या |
|---|---|
| ब्रिटन | १,२०,००,००० |
| अमेरिका | १,२०,००,००० |
| फ्रान्स | १,००,००,००० |
| डेनमार्क | २०,००,००० |

जगांतील एकूण लोकसंख्येपैकीं १५ टक्के लोकसंख्या भारतांत आहे. पण एकूण सायकलींपैकीं फक्त २·१ टक्के सायकलीच भारतांत आहेत. चीन सोडला तर लोकसंख्येशीं सायकलींचें प्रमाण भारतांत कोणत्याहि मोठ्या देशाच्या मानानें सगळ्यांत कमी आहे. सायकलींचा हा तुटवडा भरून काढण्यासाठीं १९३९ सालापासून प्रयत्न करण्यांत येऊं लागले. मुंबईची हिंद सायकल्स लि. आणि पाटण्याची हिंदुस्थान बायसिकल मॅन्युफॅक्चरिंग कॉर्पोरेशन लि. ह्या दोन कंपन्यांच्या सायकली अनुक्रमें १९४१ व १९४२ सालीं बाजारांत येऊं लागल्या.

### दर्जा राखण्याची दक्षता

सायकलींच्या बाजारपेठेची परिस्थिति अशी असतांना १९४९ सालीं सेन-रॅले कंपनीचा कारखाना १९४९ सालीं उभारण्यांत आला. ह्या कारखान्यांतून दरवर्षी २ लाख सायकली बाहेर पडतील असा अंदाज आहे. नॉटिंगहॅम येथील रॅले कंपनीच्या मदतीनें सेन अँड पंडित ह्या बंगाली कंपनीनें हा कारखाना काढला आहे. कंपनीचें अधिकृत भांडवल १ कोटी रुपयांचें आहे आणि त्या भांडवलापैकी निम्में खपलेलें आहे. कंपनीच्या भांडवलाच्या उभारणीबाबत एक गोष्ट विशेष लक्षांत घेण्यासारखी आहे. ती अशी कीं, फक्त ६·६ टक्के भांडवल ब्रिटिश कंपनीनें घातलें आहे. त्यामुळें कंपनीच्या द्रव्यविषयक व्यवहारावर हिंदी भांडवलाचेंच नियंत्रण रहाणार आहे. कंपनीच्या कारखान्याच्या इमारतीचें काम आतां चालूं झालें असून यंत्रसामुग्रीहि लवकरच येईल. प्रत्यक्ष उत्पादनाला प्रारंभ १९५१ च्या अखेरीला होईल. असनसोलपासून सुमारें ३॥ मैलांवर असलेल्या कन्यापूर ह्या गांवीं ३०० बिघे जमिनीवर कारखान्याचा व्याप पसरणार आहे. कारखान्याला लागणारा औद्योगिक शक्तीचा पुरवठा तूर्त सिंद्री येथील खताच्या कारखान्याच्या वीज-केंद्राकडून घेण्यांत येणार आहे. दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन योजना पुरी झाली म्हणजे ती मधील बोकॅरो धरणावरील वीज कारखान्याला देण्यांत येणार आहे. सेन-रॅले कंपनींत उत्पादनांतील तांत्रिक दोष काढून टाकण्यासाठीं तीन ब्रिटिश तज्ज्ञांची नेमणूक करण्यांत येणार आहे. शिवाय नॉटिंगहॅम येथील कारखान्यांत ५ हिंदी यंत्रज्ञांना फोरमनच्या कामाचें शिक्षण देण्यांत येत आहे. आतांपर्यंत भारतीय सायकलींच्या कारखान्यांत जी यंत्रसामुग्री वापरण्यांत येते त्यापैकीं पुष्कळशी सामान्य स्वरूपाची आहे. सेन-रॅले कंपनींत मात्र सायकली व त्यांचे भाग तयार करण्यासाठीं मुद्दाम बनविलेली यंत्रसामुग्रीच बसविण्यांत येणार आहे. कारखान्यांत तयार होणाऱ्या सायकली ब्रिटनमधील रॅले कंपनीच्या सायकलींच्या दर्जाच्या झाल्या पाहिजेत, असा रॅले कंपनीशीं करार आहे.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)

दरमहा १ रु. पासून १०० रुपयांपर्यंत हप्त्याची बचत योजना. व्याज ३ ते ३½ टक्के.

हेड ऑफिस- गिरगांव, मुंबई.

शाखा : दादर, माहीम, बेळगांव, पुणें.

## भारताजवळील विमानांना मागणी

भारत सरकारनें दुसरें महायुद्ध संपल्यानंतर शिलकी लष्करी सामुग्रींतून कांहीं विमानें विकत घेतलीं होतीं. त्या विमानांना आतां परदेशांतून मागणी येऊं लागली असल्यानें त्यांची किंमत वाढली आहे. अमेरिकेच्या व इतर कांहीं देशांच्या सरकारांनीं हीं विमानें मिळण्यासाठी मागणी केली आहे. भारताच्या सिव्हिल एव्हिएशन डायरेक्टोरेटच्या देखरेखीखालीं ७० 'कमांडो' विमानें, २० 'डाकोटा' विमानें आणि इतर प्रकारचीं कांहीं विमानें जपून ठेवण्यांत आलेलीं आहेत. विमानांची निर्यात न करण्याचें भारताचें धोरण सरकारच्या व्यवहारांना सुद्धां लागू असल्यानें, इतर मार्गानें ह्या विमानांचा उपयोग करण्याचे प्रयत्न चालू आहेत. ते यशस्वी झाले नाहींत तरच तीं परकीय सरकारांना विकण्याचा विचार करण्यांत येईल असें समजतें. वरील विमानांपैकीं 'कमांडो' जातीचीं विमानें चांगल्या अवस्थेंत असून हिंदुस्थान एअरक्रॅफ्ट लिमिटेड ही कंपनी त्यांची दुरुस्ती करणार आहे. हीं विमानें मूळ अमेरिकेच्या विमानदलांतील आहेत आणि युद्ध संपल्यापासून तीं पडूनच आहेत. विमानांत सर्व प्रकारच्या आधुनिक यांत्रिक सोयी करण्यांत आलेल्या आहेत. भारत सरकारच्या विनंतीवरून एका अमेरिकन वैमानिक एंजिनिअरनें त्यांची गेल्या वर्षी पहाणी केली. थोड्याशा खर्चानें तीं वापरण्याजोगीं करतां येतील असा अभिप्राय त्यानें व्यक्त केल्याचें समजतें. ज्या कंपनीनें हीं विमानें बनविलीं आहेत, ती कंपनीहि मदत करण्यास तयार आहे. 'कमांडो' विमानें 'डाकोटा'पेक्षां दुप्पट वजन नेऊं शकतात. गेल्या महायुद्धांत चीनला माल पाठविण्यासाठी त्यांचा उपयोग करण्यांत आला होता. विमानें व त्यांचे सुटे भाग मिळून सुमारें ७ कोटींचा माल सध्यां पन्नागड येथें आहे. हें ठिकाण बी. एन्. रेल्वेवर आहे. एका 'कमांडो' विमानाची खरेदीची किंमत ५०,००० रुपये आहे. दुरुस्ती करून उपयुक्त केली गेल्यास त्यांची किंमत सुमारें ५ लाख रुपये येईल असा अंदाज आहे.

## दि यूनियन बँक ऑफ कोल्हापूर, लि.

१९५० सालीं यूनियन बँकेस २३,२०० रु. नफा झाला. रिझर्व्ह फंड ६,००० रु., बॅडडेट व कॉंटिन्जन्सी फंड १,००० रु., इन्व्हेस्टमेंट फ्लक्युएशन फंड १,५०० रु., कराची तरतूद ८,२०० रु., ४% करमाफ डिव्हिडंड ६,४५७ रु., अशी नफ्याची वाटणी करण्यांत आली.

### संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | |
|---|---|---|---|
| | | रोकड व कॉल डिपॉझिट रु. | |
| वसूल भांडवल | १,६२,६५० | | ८,६८,९७३ |
| रिझर्व्ह व इतर फंड | ७९,५०० | इन्व्हेस्टमेंट्स | ४,११,७५५ |
| ठेवी | २३,०९,५८४ | कर्जें | ११,२६,८३७ |
| नफा | २३,२०० | बँक बिल्डिंग | १,१०,४७५ |

(चेअरमन : शेठ चुनिलाल ऊर्फ बाबूभाई मार्शिंगजी परमार. व्हाइस चेअरमन : शेठ एम. बी. लोहिया, जनरल मॅनेजर, कोल्हापूर शुगर मिल्स लि. मॅ. डायरेक्टर : गोपाळ गणेश आसंडे )

# दि सांगली बँक लिमिटेड, सांगली.

शेड्यूल्ड बँक ] [ स्थापना : १९१६

—: शाखा :—

१ शहापूर. २ रबकवी. ३ शिरहट्टी.
४ कवठें. ५ तेरदळ. ६ मंगळवेढें.
७ विलिंग्डन कॉलेज ( जि. द. सातारा ). ८ कऱ्हाड.
९ उगार-खुर्द ( M. S. M. RY ) १० मुंबई.

## दि. ३१ डिसेंबर १९५० रोजींची परिस्थिति दाखविणारीं संक्षिप्त पत्रकें

### ताळेबंद

| भांडवल व देणें | रु. आ. पे | मिळकत व येणें | रु. आ. पे |
|---|---|---|---|
| विक्रीस काढलेलें, घेतलेलें व वसूल: | | रोख व इतर शिल्लक | १८,४९,११२—७—१ |
| झालेलें भांडवल | ३,००,०००—०—० | हुंडी खरेदी | १,४९,८१७—८—० |
| जनरल रिझर्व | ३,१०,४०१—०—९ | इन्व्हेस्टमेंट ( मूळ किंमत ) | |
| रिझर्व फॉर टॅक्सेशन | ७७,७२६—४—६ | सेंट्रल व प्रॉव्हिन्शियल गव्हर्मेंटचे | |
| कॉंटिंजंट फंड | २०,४००—१२—० | कर्जरोखे व ट्रस्टी कर्जरोखे, सेंट्रल व | |
| ठेवी व इतर खातीं | ७६,५९,६०८—७—८ | प्रॉव्हिन्शियल गव्हर्मेंटच्या ट्रेझरी बिला- | |
| इतर बँकांकडून कर्जें | ९,७३,२१७—७—१० | सहित, शेअर्स व डिबेंचर्स ( बाजार- | |
| बिल्स पेयेबल | १,५३,४८१—७—८ | भावाप्रमाणें ३१–१२–५० रोजीं इन्व्हे- | |
| लायबिलिटीज फॉर बिल्स कलेक्शन | | स्टमेंटची किं. रु. २८,५६,०६० ) | २८,८१,७७६—५—४ |
| ( पर कॉंट्रा ) | २,०५,३४९—११—९ | लोन्स, ॲडव्हान्सिस्, कॅश क्रेडिट्स् व | |
| ब्रँच ॲडजेस्टमेंट | ८५,१०४—१३—११ | ओव्हर ड्राफ्ट्स्. | ४३,८४,५६८—१५—१ |
| संड्रीज | ७७,८४६—१४—८ | बिल्स रिसीव्हेबल ( परकॉन्ट्रा ) | २,०५,३४९—११—९ |
| नफातोटा खातें | | सांगली बँकेची इमारत व इतर स्थावर | |
| मागील ताळेबंदांतून पुढें ओढलेली | | इस्टेट | ३,०८,२३२—१४—३ |
| रक्कम २,२७१–१२–७ | | फर्निचर व फिक्चर्स | ५४,३०१—९—५ |
| अधिक चालू सालचा नफा | | इतर येणें : व्याज ५०,५७०–१०–७ | |
| ७९,४७६–६–५ | ८१,७४८—३—० | अगाऊ इन्कमटॅक्स ३९,३४७–४–० | |
| | | टेलिफोन डिपॉझिट | |
| | | व इतर २१,५०७–१४–३ | १,११,४२५–१२–१० |
| एकूण | ९९,४८,५८५—३—९ | एकूण | ९९,४८,५८५—३—९ |

### नफातोटा–पत्रक

| खर्च | रु. आ. पे | उत्पन्न | रु. आ. पे |
|---|---|---|---|
| ठेवींवर दिलेलें व्याज | १,८९,५७५—५—४ | व्याज व डिस्कौंट | ३,७५,२३२–३–० |
| इन्व्हेस्टमेंट विक्रीवरील तोटा | ३२२७—८—० | कमिशन, एक्स्चेंज व ब्रोकरेज | १६,१५३–२–३ |
| पगार व अलौन्स. | | आलेलें भाडें | १६,३३४–५–० |
| ( मॅनेजर रु. ४,८९० व इतर | | इतर :— | |
| रु. ७२,१३५–१०–११ ) | ७७,०२५–१०–११ | (अ) शेअर ट्रॅन्स्फर फी ६–४–० | |
| डायरेक्टर फी व अलौन्स | ४,४००—०—० | (ब) सेफ कस्टडी ७,९०३–०–० | |
| लोकल कमेटी मेंबर फी व अलौन्स | ३८२—३—० | (क) किरकोळ १०९–२–० | ८,०१८–६–० |
| प्रॉव्हिडंड फंड | ५,१५०—६—० | | |
| भाडें, टॅक्सीस, इन्शुअरन्स, प्रवास व सामान्य खर्च | २९,४४९—७—९ | | |
| कोर्ट खर्च व रिटेनर फी | १,४९९–१४—० | | |
| पोस्टेज तारखर्च व स्टॅम्प्स् | ५,१५५–१३—१ | | |
| ऑडिटर्स फी | १,०५०—०—० | | |
| घसारा:— | | | |
| इमारती रु. ५,००० व फिक्चर्स रु. २,००० | ७,०००—०—० | | |
| स्टेशनरी, प्रिंटिंग व ॲडव्हरटाइजमेंट | १२,३४५—५—९ | | |
| चालू सालचा निव्वळ नफा | ७९,४७६—६—५ | | |
| एकूण | ४,१५,७३८—०—३ | एकूण | ४,१५,७३८–०–३ |

**G. M. OKA & CO.**
Chartered Accountants.

**G. M. DANDEKAR,**
Chartered Accountant.

**S. E. Sukhathankar,**
चेअरमन्.

श्री. रामभाऊ बाबाजी आरवाडे
श्री. महादेव हरी गोडबोले
श्री राजाराम रामचंद्र शहा
श्री. लिलाचंद खेमचंद शहा
श्री. धनपाल लक्ष्मण आरवाडे
श्री. लालचंद मयमल
मेंबर्स बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

**S. L. Gavade,**
अकौंटंट.

**M. K. Gupte,**
मॅनेजर.

### ब्रिटिश पौंडाची जिनसा विकत घेण्याची शक्ति

दुसऱ्या महायुद्धानंतर सर्व देशांत चलनवृद्धीनें थैमान घातलेलें आहे. सोप्या व सरळ भाषेंत सांगावयाचें तर पैशाचा सुकाळ आणि वस्तूंचा दुष्काळ असें ह्या परिस्थितीचें वर्णन करतां येईल. १९३८ सालांतील ब्रिटिश पौंडाच्या क्रयशक्तीशीं १९५१ सालांतील क्रयशक्तीची तुलना अधिकृतरीत्या नुकतीच करण्यांत आली. ब्रिटनचे चॅन्सेलर ऑफ दि एक्सचेकर ह्यांनीं पार्लमेंटमध्यें असें सांगितलें कीं ग्राहकांना लागणाऱ्या वस्तू व बचत ह्यांच्या रूपामध्यें ब्रिटिश पौंडाची किंमत १९३८ साली २० शिलिंग होती; १९५१ सालीं तीच किंमत १० शिलिंग आहे. म्हणजे असें कीं १९५१ साली १९३८ च्या मानानें, पौंडाला निम्म्याच वस्तू विकत मिळूं शकतात. ह्या परिस्थितींत कांहीं अनुकूल फरक पडण्याचीं चिन्हें अजून तरी दिसत नाहींत. अर्जेंटायनाशीं ब्रिटनचा जो करार झाला आहे त्याचा परिणाम म्हणून ब्रिटनमध्यें मासाच्या किरकोळ विक्रीच्या किंमती वाढल्या आहेत. ऑस्ट्रेलिआ, न्यूझीलंड आणि हॉलंड मधून आयात होणाऱ्या दुधदुभत्याच्या पदार्थांच्या किंमतीहि वाढत आहेत. बटाट्यांच्या घाऊक किंमतीहि चढल्या आहेत. बऱ्याच बंदरांत मालवाहू बोटींची व्यवस्था नीट होत नाहीं. त्यामुळें माल उतरविणें व चढविणें याला वेळ लागतो. अर्थात् किंमती वाढतात. कच्च्या मालाचा तुटवडाहि ब्रिटनला बोचूं लागला आहे. ब्रिटनच्या सध्यांच्या अडचणीच्या परिस्थितींत भरींत भर म्हणून शस्त्रास्त्रांची वाढहि करावी लागत आहे. कच्चा माल बाहेरून आणण्यासाठी निर्यात व्यापारांत वाढ करणें आवश्यक आहे. ह्या सर्वांचा परिणाम म्हणजे ब्रिटनमधील रहाणीचें मान खालावणें हा होय. अमेरिका सोडून इतर सर्वच देशांत रहाणीचें मान घसरत चालल्यानें जगभर अमेरिकेवर टीका होऊं लागली तर नवल नाहीं.

---

### कांहीं नवीं पुस्तकें

आर्थिक घडामोडी (१९३०–५०) लेखक:–ध. रा. गाडगीळ व नी. वि. सोवनी. गाडगीळ व सोवनी ह्यांनीं निरनिराळ्या आर्थिक घडामोडींसंबंधीं केलेल्या स्फुट लिखाणांचें एकत्रीकरण. गोखले अर्थशास्त्र संशोधन संस्थेचें तिसरें मराठी प्रकाशन. पृ. सं. २८७. किं. ८ रु.

कोऑपरेटिव्ह फार्मिंग (विथ स्पेशल रेफरन्स टु बॉंबे स्टेट) लेखक:–आर. एम. तळपदे, बी. ए., सुपरिंटेंडेंट, बॉंबे प्रॉ. को. इन्स्टिटयूट. प्रस्तावना लेखक:–श्री. वैकुंठ ल. मेहता, अर्थ–सहकार मंत्रि, मुंबई राज्य. मुंबई प्रां. स. इन्स्टिटयूटचें प्रकाशन. पृ. सं. ४५. किंमत १ रु. ८ आ.

दि लिटल शॉप. लेखक:–एफ. डी. क्लिंगेंडर (लहान दुकानदारांचा सामाजिक अभ्यास). दि ब्यूरो ऑफ करंट अफेअर्स, ११७, पिकॅडिली, लंडनचें १२७ वें प्रकाशन. पृ. सं. १८. किंमत ९ पेन्स.

---

### बृहन्महाराष्ट्र कॉलेजचा कोनशिला समारंभ

दि बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्सच्या इमारतीचा कोनशिला समारंभ शनिवार, ता. २६ मे रोजीं सायंकाळीं ६ वाजतां कॉलेजच्या स्वतःचे जागेंत (सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे पश्चिमेस) डॉ. जॉन मथाई, डी. एस्स. सी., सी. आय. ई, टाटा सन्स लि.चे डायरेक्टर, ह्यांचे हस्तें होणार आहे. बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. नें डे. ए. सोसायटीस कॉमर्स कॉलेजसाठी २ लक्ष रु. ची देणगी दिली, तिला ह्या इमारतीनें मूर्त स्वरूप प्राप्त होणार आहे.


(मिरज येथें १९१९ साली स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित)

## दि मिरज स्टेट बँक लि.

—मिरज—

शेड्यूल्ड बँक

(स्थापना : १९१९)

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. १२,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर (जि. धारवाड)

★ कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज (पे ऑफिस)

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन.    के. डी. शिरगांवकर मॅनेजर

## दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली.

स्थापना १९२७

हेड ऑफिस:—हायस्कूल रोड, सांगली.

शाखा:—१ जत, २ मिरज, ३ तासगांव.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये | १०,००,००० |
| खपलेलें „ | रुपये | २,२१,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रुपये | १,४२,००० |
| फंडस् | रुपये | १,२३,००० |
| खेळतें भांडवल | रुपये | १५,००,००० चे वर. |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

सरकारतर्फे:—

मे. भ. अं. दप्तरदार, B. A., चेअरमन.

मे. असि. रजिस्ट्रार को. सो. सातारा.

मे. रा. बा. आरवाडे, B. A., LL. B.

मे. ज. वि. करमरकर, सराफ.

सोसायट्यांतर्फे:—

मे. के. आ. चौगुले, B. A., LL. B.

मे. हिं. म. पाटील.

मे. रा. म. पाटील.

वैयक्तिक सभासदांतर्फे:—

मे. म. ह. गोडबोले, B. A., LL. B.

मे. शु. आ. पाटील.

करंट, सेव्हिंग्ज व कायम ठेवी स्वीकारल्या जातात.

बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

ना. पां. ठाणेदार, मॅनेजर.    भ. अं. दप्तरदार, बी. ए. चेअरमन.

## १९५० मधील हिंद व ब्रिटन यांमधील व्यापार

( मा. म. काळे )

१९५० साली ब्रिटननें हिंदकडून सुमारें २४ कोटी पौंड चहा खरेदी केला व त्याची किंमत सुमारें ३॥ कोट पौंड होती. हिंदमधून ब्रिटनकडे झालेल्या निर्गतीपैकीं चहाची निर्गत ३३ टक्के किंमतीची होती. गेल्या दोन वर्षांत हिंदमधून ब्रिटनकडे तंबाखूची निर्गत दुप्पट झाली आहे. १९५० साली ४ कोटी, ८० लक्ष पौंड तंबाखू निर्गत होऊन त्याची किंमत ८० लक्ष पौंड होती. हिंदमधून ९५ दशलक्ष चौरस वार तागाचें कापड व सुमारें ११ हजार टन वजनाच्या तागाच्या पिशव्या किंवा थैल्या ब्रिटनकडे निर्गत झाल्या. हिंदकडून कमावलेलीं कातडीं ११ दश लक्ष पौंड किंमतीची ब्रिटनकडे निर्गत झालीं. शेलॅक व लाख इ. ची हिंदमधून ब्रिटनकडे निर्गत २ दश लक्ष पौंड किंमतीची झाली. गालीचे व तक्तपोशीच्या आच्छादनाचे रग्ग्स यांची निर्गत हिंदमधून सुमारें ३ दश लक्ष पौंड किंमतीची झाली. काथ्याच्या चटया व तत्सम मालाची हिंदमधून निर्गत २॥ दश लक्ष पौंड किंमतीची झाली. हिंदमधून ब्रिटनकडे निर्गत होणाऱ्या प्रत्येक मालाचें प्रमाण व एकंदर किंमत यांत गेल्या एका वर्षांतहि बरीच वाढ झाली आहे.

ब्रिटनकडून हिंदकडे बराच पक्का माल निर्गत होतो. त्यापैकीं ३३ टक्के किंमतीचा माल हा केवळ यंत्रसामुग्रीच्या स्वरूपाचा १९५० साली होता. गेलीं तीन वर्षे इतर कोणत्याहि देशापेक्षां हिंदकडे यंत्रसामुग्री निर्गत सर्वांत जास्त प्रमाणांत होत आहे. १९५० साली १ लक्ष, २३ हजार टन वजनाची यंत्रसामुग्री ब्रिटननें हिंदला पाठविली व तिची किंमत ३६ दश लक्ष पौंडावर होती. यंत्रसामुग्रीपैकीं ५६१९ टन यंत्रसामुग्री शेतीसाठी लागणारी होती, व विजेच्या धंद्यासाठी निरनिराळ्या प्रकारांची सुमारें १२ हजार टन यंत्रसामुग्री असून तिची किंमत ४७ लक्ष पौंड होती. कंबस्टिबल इंजिन्स १५,७८३ टन गेल्या वर्षी ब्रिटननें हिंदकडे पाठविलीं व याहि आंकड्यांत १९४९ च्या मानानें २५ टक्के वाढ दिसून येते. छपाई व बुक बाइंडिंग यांसाठी १,६०८ टन यंत्रसामुग्री आयात झाली. कापड धंद्याला लागणारी २२,२९३ टन यंत्रसामुग्री ब्रिटननें हिंदला १९५० साली पाठविली व तिची किंमत सुमारें ७७ लक्ष पौंड होती. ब्रिटननें हिंदला १३७ रेल्वे इंजिनें १९५० साली पाठविलीं. परंतु १९४९ सालीं ब्रिटनकडून फक्त ७२ रेल्वे इंजिनें पाठविण्यांत आलीं होतीं. हिंदनें गेल्या वर्षी ब्रिटनकडून १०,३७८ मोटारी खरेदी केल्या, व हा आंकडा १९४९ च्या खरेदीच्या दुप्पट आहे. विजेचा माल मात्र १९५० साली पूर्वीच्या वर्षाच्या मानानें कमी किंमतीचा आला तरीहि त्याची किंमत ६६ लक्ष पौंड होती. हिंदनें सुमारें ६४ लक्ष पौंड लोकरीचा व तत्सम माल १९५० सालीं आयात केली. १९४९ साली याच प्रकारचा ५४ लक्ष पौंड माल आयात झाला होता. एकंदरींत १९५० मध्यें हिंद व ब्रिटन यांच्यामधील परस्पर व्यापारांत बरीच वाढ झाली.

---

### काडीमोडाचें अर्थशास्त्र

अमेरिकन सिनेतारका रिटा हेवर्थ हिनें प्रिन्स अलिखानशीं काडीमोड क[illegible]चें ठरविलें आहे. रिटा-अलीच्या १५ महिन्यांच्या यास्मिन [illegible]ा मुलीसाठी ३० लक्ष डॉलर्सच्या ट्रस्ट फंडाची रिटाची [illegible]गा आहे. विवाहाचे वेळीं रिटानें आलिखानला वचन दिल्याप्र[illegible]नें यास्मिनला मुस्लिम म्हणून वाढविणार असल्याचें रिटाच्या [illegible]कसटानें जाहीर केलें आहे. काडीमोडास विरोध करण्याचा अलिखानचा विचार नसण्याचा संभव आहे.

## आयुर्वेदीय औषधी व्यवसाय

( डॉ. वि. ल. आगाशे, अध्यक्ष, आयुर्वेदीय अर्कशाळा लि., सातारा )

"युद्धोत्तर काळांत पुष्कळशा विदेशी औषधी कंपन्यांनीं या देशांतच आपलीं उत्पादन केंद्रें उघडलेलीं असून त्यांच्या धंद्याला गेल्या दहा वर्षांत जी प्रचंड गति मिळालेली आहे तिचा फायदा घेऊन या विदेशी औषधांच्या प्रसाराची सर्वव्यापी मोहीम आरंभण्यांत आलेली आहे. या देशांतला सरकारसंमत वैद्यकीय व्यवसाय स्वातंत्र्यप्राप्तीच्या काळापर्यंत या औषधांच्या प्रसाराला सर्वस्वी अनुकूल होता. स्वातंत्र्योत्तर काळांत केंद्रीय व राज्य सरकारांनीं आयुर्वेद शास्त्राच्या पुनरुत्थानासाठी प्रयत्न आरंभिले आहेत. पण अद्याप या आयुर्वेदाच्या पुरस्काराचा केवळ आरंभच असून पाश्चात्य वैद्यकाचा प्रसार मात्र त्या मानानें अत्यंत सुसंघटित स्वरूपांत झालेला आहे. या परिस्थितींत आयुर्वेदीय औषधी व्यवसाय यशस्वी आणि वैभवशाली व्हावयाचा असेल तर प्रमाणित व निरपवाद विश्वसनीय औषधीनिर्मितीबरोबरच या व्यावसायिकांकडून परस्पर सहकार्य आणि एकसूत्री धोरण यांचा अवलंब करण्यांत आला पाहिजे.

"उदाहरण म्हणून औषधांच्या किंमतीचाच प्रश्न घ्या. युद्धपूर्व काळाच्या तुलनेनें आज कच्चा माल, मजुरी, वाहतूक आणि इतर उत्पादन साधनें यांच्या किंमतींत ज्या प्रमाणांत वाढ झालेली आहे त्या मानानें औषधांच्या किंमती वाढलेल्या नाहींत. याचा परिणाम नफ्याचें प्रमाण घटण्यांत झाला आहे; इतकेंच नव्हे तर या व्यवसायांतल्या पुष्कळांना ही परिस्थिति कमालीची जाणवत आहे. जीं औषधें 'ग्रंथोक्त' आहेत त्यांच्या किंमतींत तारतम्यानें सारखेपणा असावा असें मला वाटतें. 'स्वस्त किंमत' याच वैशिष्ट्याला 'गुणकारीत्वा' पेक्षां अधिक महत्त्व देण्याची अवस्था आज बाजारांत अनुभवाला येते. यांत पालट घडवून आणावयास नको काय?

"विक्री धोरणांत सर्व व्यावसायिकांनीं एकत्र येऊन सुसंगति निर्माण केली तर प्रत्येकाला आपआपल्या क्षेत्रांत निर्वेधपणें व्यवसाय चालवितां येईल आणि बाजारांत या धंद्याची विशिष्ट पातळी राहील. आजच्या जनसत्ताक राजवटींत आयुर्वेदाचा पुनरुद्धार करण्याविषयीं केंद्रीय व घटकराज्य सरकारांचा प्रयत्न चालू आहे. आयुर्वेद तत्त्वांचें संशोधन, अन्वेषण जरूर व्हावें, पण त्याचें आंग्लीकरण होऊं नये; आयुर्वेदाचें मूलचें शुद्ध स्वरूप अधिकृतपणें उज्वल तऱ्हेनें प्रकाशमान व्हावें असा या प्रयत्नांचा हेतु असावा. त्याबरोबरच सरकारनें आयुर्वेदीय औषधी उत्पादन व्यवसायाकडेहि सहानुभूतीनें पाहावें अशी माझी सूचना आहे."

---

**बनारस विद्यापीठाचा कांच-विभाग** - बनारस विद्यापीठाच्या कांच-विभागाची पुनर्घटना करण्यासाठी उत्तरप्रदेश सरकारनें एक कमिटी नेमली होती. कांचेच्या धंद्याचा शिक्षणक्रम अधिक व्यापक करून चार वर्षांचा करण्यांत यावा अशी शिफारस कमिटीनें केली आहे. ह्या विभागाला ३०,००० रुपयांची मदत करण्यांत यावी अशीहि सूचना कमिटीनें केली आहे.

**पालघर येथील मत्स्यशाळा**—पालघर जवळील सातपती गांवांत मत्स्यशाळेची इमारत बांधण्यांत आली आहे. ह्या इमारतीला सुमारें ९५,००० रुपये खर्च आला. मुंबई राज्यांत मच्छेमारीच्या धंद्याचें शिक्षण देणारी ही सर्वांत मोठी शाळा आहे. सध्या ह्या शाळेंत ८०० विद्यार्थी शिकत आहेत.

[illegible] हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५१। आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व [illegible]द वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.